# प्रकरण ४ थे

## माहितीचे विश्लेषण व विशदीकरण

### शिक्षकांच्या प्रश्नावल्या व मुख्याध्यापकांच्या मुलाखती

४.१ प्रास्ताविक

४.२ प्रतिसादक शिक्षकांची माहिती.

४.३ उद्दिष्टा विषयीची माहिती.

४.४ अभ्यासक्रमाविषयी माहिती.

४.५ अध्यापनाच्या पध्दतीबाबत माहिती.

४.६ शैक्षणिक साधनांबाबत माहिती.

४.७ ग्रंथालयाविषयी माहिती.

४.८ अभ्यासपूरक कार्यक्रमाविषयी माहिती.

४.९ मूल्यमापनाबाबत शिक्षकांनी दिलेली माहिती.

४.१० मुख्याध्यापकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण.

४.११ शाळांना दिलेल्या भेटीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण.

४.१२ सारांश.

# प्रकरण ४ थे

## माहितीचे विश्लेषण व विशदीकरण

## शिक्षकांच्या प्रश्नावल्या व मुख्याध्यापकांच्या मुलाखती

### ४.१ प्रास्ताविक:

पहिल्या तीन प्रकरणामध्ये संशोधकाने फक्त तात्वीक भागाचाच विचार केला आहे. मागील प्रकरणाचा उपयोग हया संशोधनाची पार्श्व-भूमी तयार करण्यासाठी असून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व विशदी-करण करणे हे प्रस्तुत प्रकरणाचे उद्दिष्ट आहे.

अभ्यासकाने अहमदपूर तालुका तसेच अहमदपूर शहरातील माध्यमिक शाळातील इयत्ता ८ वी ते १० ला इतिहास शिकवणाऱ्या शिक्षका-साठी प्रश्नावली तयार केली. [परिशिष्ट क्र.अ पहा] एकूण १०० शाळांना प्रश्नावल्या पाठविल्या. त्यातील अहमदपूर तालुक्यातून ३५ प्रश्नावल्या व अहमदपूर शहरातून ३५ प्रश्नावल्या भरुन मिळाल्या. [परिशिष्ट क्र. ब पहा]

या प्रश्नावल्या भरुन परत मिळविण्यासाठी अभ्यासकाने ३ स्मरणपत्रे पाठविली. तसेच काही शिक्षकांना वैयक्तिक भेटून प्रश्नावल्या मिळविल्या.

त्याचप्रमाणे १० मुख्याध्यापकांच्या मुलाखती अभ्यासकाने घेतल्या. [परिशिष्ट क्र.ड पहा] मुख्याध्यापकाच्या मुलाखती घेण्यापूर्वी संबंधीत विषयावर आधारित मुलाखतीची प्रश्नावली मुख्याध्यापकाना पाठविण्यांत आली [परिशिष्ट क्र.क पहा.] तसेच १० शाळांना भेटी दिल्या.

शिक्षक, मुख्याध्यापक याच्या प्रतिसादावरुन मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व विशदीकरण करण्यांत आले.

### ४.२ प्रतिसादक शिक्षकांची माहिती:

प्रश्नावलीचा पहिला भाग हा शिक्षकाच्या माहितीच्या संदर्भात होता त्यात असे प्रश्न विचारले होते. उदा. पूर्ण नाव [प्रश्न क्र. १] शैक्षणिक अर्हता [प्र.क्र.२] शाळेचे नाव [प्रश्न क्र. ३] -

अध्यापनाचा अनुभव [प्रश्न क्र. ४] प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली उत्तर माहिती हा मुख्य भाग होता. त्यावर लक्ष केंद्रीत केले. हे प्रश्न प्रतिसादक शिक्षकांची व्यक्तिगत माहिती दर्शवितात.

खालील कोष्टकात [ ४.१ ] शिक्षकाकडून भरुनआलेल्या प्रश्नावलीच्या आधारे शिक्षकांची शैक्षणिक पात्रता दाखविली आहे.

<u>कोष्टक क्र. ४.१</u>

<u>शिक्षकांची शैक्षणिक पात्रता.</u>

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा–या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | एम. ए., एम. एड्. | ०८ | ११.४२% |
| २] | एम. ए., बी. एड्. | ०६ | ८.५७ |
| ३] | बी. ए., बी. एड्. | १८ | २५.७२ |
| ४] | सिनियर पी.टी.सी. [सिनियर ट्रेंड] | १० | १४.२८ |
| ५] | ज्युनियर पी.टी.सी. | ०६ | ८.५७ |
| ६] | एस. एस. सी./डी. एड्. | १४ | २० |
| ७] | बी. ए., डी. एड्. | ०८ | ११.४२ |
| | | ७० | |

वरील कोष्टक क्रमांक [४.१] वरुन स्पष्ट होते की बी.ए. बी.एड्. असणा–या प्रतिसादक शिक्षकांची संख्या [२५.७२%] आहे. एस. एस. सी., डी. एड्. असणा–या शिक्षकांची संख्या [२०%] आहे. सिनियर पी.टी.सी. असणा–या शिक्षकांची संख्या [१४.२८%] आहे. एम.ए., एम.एड्. असणारे शिक्षक ११.४२% आहेत.

वरील प्रतिसादाचा विचार करता बी.ए., बी.एड्. शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे.

माध्यमिक पातळीवर शिकवण्यासाठी बी.ए.,बी.एड्. शिक्षकांची आवश्यकता असते. त्यामुळे हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे. तरीही यापेक्षा अधिक बी.एड्. शिक्षकांची आवश्यकता आहे.

पुढील कोष्टकात [४.२] प्रतिसादक शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव दाखवला आहे.

कोष्टक क्र. ४.२

शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | ० - ५ | ०४ | ५.७१ |
| २] | ६ - १० | १० | १४.२० |
| ३] | ११ - १५ | २० | २८.५७ |
| ४] | १६ - २० | १६ | २२.८५ |
| ५] | २१ - २५ | ०८ | ११.४८ |
| ६] | २६ - ३० | ०८ | ११.४२ |
| ७] | ३१ - ३५ | ०२ | २.८५ |
| ८] | ३६ - ४० | ०२ | २.८५ |
| | | ७० | |

वरील कोष्टक क्रमांक [४.२] वरून स्पष्ट होते की, ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे शिक्षक [२८.५०%] आहेत. आणि १६ ते २० वर्षे अनुभव असणारे शिक्षक [२२.८५%] आहेत. ६ ते १० वर्षे अनुभव असणारे शिक्षक [१४.२०%] आहेत.

याचा अर्थ असा की, ११ ते १५ वर्षे अनुभव असणा-या शिक्षकांचा प्रतिसाद जास्त प्रमाणात आहे. १६ ते २० वर्षे अनुभव असणा-या शिक्षकांचा प्रतिसाद बरा आहे. ६ ते १० वर्षे अनुभव असणा-या शिक्षकांचा प्रतिसाद ही

कमी प्रमाणात आहे. इतिहासाच्या अध्यापनासाठी अनुभव असणारे शिक्षकांची गरज आहे. कारण त्यांच्या अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळतो. पुढील कोष्टकात [४.३] शिक्षकांनी अध्यापन केलेले वर्ग दाखवले आहेत.

कोष्टक क्र. [ ४.३ ]

अध्यापन केलेले गवर्ग

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | ८वी | १५ | २१.४२ |
| २] | ९ वी | ५२ | ७४.२८ |
| ३] | १० वी | ३० | ४२.८५ |

वरील कोष्टकावरून [४.३] स्पष्ट होते की, इयत्ता ९ वी च्या वर्गांना शिकवणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [७४.२८%] आहे. इयत्ता १० वीला शिकवणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [४२.८५%] आहे. इयत्ता ८ वीला शिकवणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [२१.४२%] आहे.

याचा अर्थ असा की, इयत्ता ९ वीला शिकवणा-या वर्गांचा प्रतिसाद अधिक आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे.

इयत्ता आठवी आणि नववी मध्ये मुलांना इतिहास चांगल्या प्रकारे शिकवल्यास इतिहास विषयाची गोडी लागून १० वीत नापास होण्याचे प्रमाण कमी होते.

पुढील कोष्टकात [४.४] मध्ये शिक्षक शिकवत असलेल्या विषयांचा विचार केला आहे.

## कोष्टक क्र. [४.४]

## शाळेत शिकवत असलेले इतर विषय

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | मराठी | ३५ | ४९.९९ |
| २] | हिंदी | २८ | ३९.९९ |
| ३] | इंग्रजी | २५ | ३५.७१ |
| ४] | गणित | ३० | ४२.८५ |
| ५] | विज्ञान | २० | २८.५७ |
| ६] | भूगोल | ४० | ५७.१४ |

वरील कोष्टकावरून [४.४] हे स्पष्ट होते की, शाळेत शिकवण्यात येणाऱ्या विषयापैकी भूगोल शिकवणाऱ्या इतिहासाच्या शिक्षकांचा प्रतिसाद [५७.१४%] आहे. मराठी शिकवणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [४९.९९%] आहे.

इतिहास आणि भूगोल हे विषय समाजशास्त्रात मोडत असल्याने त्या दोन विषयामध्ये संबंध असणे इष्ट आहे. त्यामुळेच इतिहासाचे शिक्षक भूगोल विषयही शिकवितात. मराठी ही मातृभाषा असल्याने बरेच इतिहासाचे शिक्षक मराठी हा विषय शिकविणे संयुक्तिक आहे.

पुढील कोष्टकात [४.५] मध्ये इतिहास अध्यापनाच्या उद्दिष्टांचा विचार केला आहे.

## ४.३ इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे:

प्रश्न क्र. ७,८ आणि ९ द्वारे इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे कोणती आहेत, ती कितपत साध्य होतात व ती साध्य न होण्याची कारणे यांचा विचार करण्यात आला आहे.

कोष्टक क्र. [४.५]

इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | नागरीकत्वाची जाणीव निर्माण करणे | ४० | ६४.२८ |
| २] | इतिहासाची गोडी निर्माण करणे | २५ | ३५.७१ |
| ३] | पूर्वी घडलेल्या घटनांची माहिती देणे | २० | २८.५७ |
| ४] | भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे | ३५ | ५० |
| ५] | राष्ट्रीय भावना वाढीस लावणे | ४५ | ६४.२८ |
| ६] | जागतिक इतिहासाची ओळख करून देणे | ३० | ४२.८५ |
| ७] | राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे | ४५ | ६४.२८ |
| ८] | आंतरराष्ट्रीय सामजस्य निर्माण करणे | २० | २८.५७ |

वरील कोष्टक क्रमांक [४.५] वरून स्पष्ट होते की, इतिहासाची उद्दिष्टये विविध आहेत. त्यापैकी १ नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे या उद्दिष्टांचा प्रतिसाद [६४.२८%] आहे. राष्ट्रीय भावना वाढीसलावणे या उद्दिष्टांचा प्रतिसाद [६४.२८%] आहे. तसेच राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे या उद्दिष्टासही ६४.२८% प्रतिसाद मिळाला आहे.

वरील उद्दिष्टापैकी नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे या

उद्दिष्टाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. या उद्दिष्टा बरोबरच राष्ट्रीय भावना वाढीस लावणे आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे ह्या उद्दिष्टांना पसंती क्रम शिक्षकांनी दिला आहे. ही बाब समाधानाची आहे.

इतिहास अध्यापनातुन सर्वच उद्दिष्टये साध्य झाली पाहिजेत. केवळ ठराविक उद्दिष्टये साध्य होऊन चालणार नाही. सर्वच उद्दिष्टये साध्य झाल्यास त्या ज्ञानाचा फायदा मुलांना होतो. विविध उद्दिष्टये साध्य करता येतील.

पुढील कोष्टक क्रमांक [ ४.६ ] मध्ये उद्दिष्टये कितपत साध्य होतात. हे व्यक्त केले आहे.

कोष्टक क्र.[४.६ ]


उद्दिष्टये कितपत साध्य होतात.

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अंशतः | १३ | १८.५७ |
| २. | कमी प्रमाणात | ०३ | ४.२८ |
| ३. | पूर्ण साध्य होतात. | ०८ | ११.४२ |
| ४. | मोठ्या प्रमाणात | ४१ | ५८.५७ |
| ५. | अनुत्तरित | ०५ | ७.१४ |
| | | ७० | |

वरील कोष्टक क्र. [४.६] वरुन स्पष्ट होते की, उद्दिष्टये साध्य होण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत. उद्दिष्टये मोठ्या प्रमाणात साध्य होतात म्हणणारे शिक्षक [५८.५७ टक्के ] आहेत. अंशतः साध्य होतात, असे म्हणणारे शिक्षक [१८.५७]टक्के आहेत. आणि पूर्ण साध्य होतात म्हणणारे शिक्षक [ ११.४२ टक्के ] आहेत.

# आलेख क्र. ४.७ कोष्टक क्र. (४.७)

## उद्दिष्टे साध्य न होण्याची कारणे दर्शविणारा आलेख.



७२ याचा अर्थ असा की, मोठया प्रमाणात उद्दिष्टये साध्य होतात म्हणणारे शिक्षक [ ५८.५७ टक्के ] अधिक आहेत.

वरील तिन्ही उद्दिष्टांचा विचार करता, उद्दिष्टये मोठया प्रमाणात साध्य होतात. या उद्दिष्टाना मिळालेला प्रतिसाद विषयाच्या दृष्टिने व मुलांच्या दृष्टिने उपयुक्त आहे.

खालील कोष्टक क्र. [४.७] मध्ये उद्दिष्टये पूर्ण साध्य न होणे या कारणांचा विचार केलेला आहे.

कोष्टक क्र. [४.७]

उद्दिष्टये पूर्ण साध्य न होण्याची कारणे.

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप. | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | उद्दिष्टये व्यापक आहेत. | ३४ | ४८.५७ |
| २. | उद्दिष्टानुसार अभ्यासक्रम नाही. | १७ | २४.२८ |
| ३. | पाठयपुस्तके अपुरी पडतात. | २५ | ३५.७१ |
| ४. | वेळ कमी पडतो. | ३१ | ४४.२८ |
| ५. | अनुत्तरीत. | १३ | १८.५७ |

वरील कोष्टकावरुन [४.७] हे स्पष्ट होते की,
साध्य न होण्याची कारणे उद्दिष्टये व्यापक
कमी पडणे [ ४४.२८ टक्के ] पाठयपुस्तके अपु
आहेत. अध्यापनाचे उद्दिष्टये साध्य न होण्य
व्यापक असणे हे आहे.

अध्यापनाची उद्दिष्टये सा
निश्चित स्वरुपाची असावी लागत
आहे. त्याचप्रमाणे वेळ पुरेसा अ

खालील कोष्टकात [४.९] मध्ये इतिहासाचा शंभर गुणांचा पेपर ठेवावा याबाबत शिक्षकांनी मत व्यक्त केले आहे.

कोष्टक क्र. [४.९]

शंभर गुणांचा पेपर ठेवावा काय.

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ५२.८५ |
| २ | नाही | ३३ | ४७.१४ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.९] हे स्पष्ट होते की, माध्यमिक पातळीवर शंभर गुणांचा पेपर ठेवावा म्हणणारे प्रतिसादक शिक्षक [५२.८५ %] आहेत. शंभर गुणांचा सक्तिचा पेपर ठेवू नये म्हणणारे प्रतिसादक शिक्षक [४७.१४ %] आहेत.

यावरून असे आढळून येते की, शंभर गुणांचा पेपर ठेवावा म्हणणा-या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे. इयत्ता आठवी ते दहावीच्या अभ्यासक्रमात इतिहास विषयाचा शंभर गुणांचा पेपर ठेवणे आवश्यक आहे. इतर विषया इतकेच महत्व या विषयाला देणे आवश्यक आहे.

पुढील कोष्टक [४.१०] वरुन अभ्यासक्रमात स्थानिक इतिहासाचा समावेश करावा किंवा नाही हे दाखविले आहे.

## कोष्टक क्र.[४.१०]

### अभ्यासक्रमात स्थानिक इतिहासाचा समावेश.

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ६७ | ९५.७१ |
| २ | नाही | ०३ | ४.२८ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन [४.१०] हे स्पष्ट होते की, स्थानिक इतिहासाचा अभ्यासक्रमात समावेश करावा म्हणणारे प्रतिसादक शिक्षक [९५.७१%] इतके आहेत. अभ्यासक्रमात स्थानिक इतिहासाचा म समावेश करुनये म्हणणारे प्रतिसादक शिक्षक [४.२८%] इतके आहेत. याचा अर्थ असा की, आजच्या अभ्यासक्रमात स्थानिक इतहिासाचा समावेश करावा म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे. ही बाब इतीहास विषयासाठी उपयुक्त आहे.

स्थानिक इतिहासाव्दारे इतिहास विषयाची आवड विद्यार्थ्यांत निर्माण करता येते. स्थानिक इतीहासातूनच जगाचा इतिहास समजावून देणे सोपे जाते.

पुढील कोष्टक [४.११] मध्ये आठवड्यामध्ये इतिहास विषयाच्या किती तासिका असाव्यात हे सांगितले आहे.

## कोष्टक क्र. [४.११]

## आठवड्यातील इतिहास विषयाच्या तासिका

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | १ | १४ | २० |
| २] | २ | ४८ | ६८.५७ |
| ३] | ३ | ०८ | ११.४२ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.११] हे स्पष्ट होते की, आठवड्यामध्ये इतिहास विषयासाठी एक तासिका ठेवली आहे म्हणणारे प्रतिसादक शिक्षक [२० %] आहेत. आठवड्यात दोन तासिका ठेवले आहेत म्हणणारे शिक्षक [६८.५७ %] आहेत. आठवड्यामध्ये तीन तासिका ठेवल्या आहेत म्हणणारे शिक्षक [११.४२ %] आहेत.

याचा अर्थ असा की, दोन तासिका ठेवल्या आहेत म्हणणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य नाही. आठवड्यामध्ये इतिहासाच्या तासिकांची संख्या वास्तविक जास्त ठेवणे आवश्यक आहे.

पुढील कोष्टक [४.१२] नुसार तासिका पुरेशा अथवा अपुऱ्या याबाबत शिक्षकांनी मत व्यक्त केले आहे.

कोष्टक क्र. [४.१२]

तासिका पुरेशा अथवा अपु-या

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | १३ | १८.५७ |
| २] | नाही | ४७ | ६७.१४ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.१२] हे स्पष्ट होते की, शालेय वेळापत्रकात असणा-या इतिहास विषयाच्या तासिका पुरेशा आहेत, असे म्हणाणा-या प्रतिसादक शिक्षकांची संख्या [१८.४६ %] आहे. शालेय वेळापत्रकांत तासिका कमी आहेत असे म्हणाणा-या प्रतिसादक शिक्षकांची संख्या [६७.१४ %] आहे.

वरील दोन्ही प्रतिसादावरून असे स्पष्ट होते की, तासिका पुरेशा नाहीत म्हणाणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे. याचा अर्थ असा की, आठवड्यात तासिकांची संख्या कमी असल्याने इतिहासाचे अध्यापन बरोबर होवू शकत नाही. म्हणून तासिकांची संख्या किमान तीन हवी.

पुढील कोष्टक क्र.[४.१३] वरून शालेय वेळापत्रकात तासिकांचा कितवा क्रम आहे याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.१३]

तासिकांचा वेळापत्रकात क्रम

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | १ | १० | १४.२८ |
| २] | २ | ०८ | ११.४२ |
| ३] | ३ | ०२ | ०२.८५ |
| ४] | ४ | ०८ | ११.४२ |
| ५] | ५ | ०५ | ०७.१४ |
| ६] | ६ | ०९ | १२.८५ |
| ७] | ७ | २८ | ४०.०० |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन [४.१३] हे स्पष्ट होते की, शालेय वेळापत्रकात असणारा तासिकांचा क्रम शेवटचा आहे असे म्हणणारे प्रतिसादक शिक्षक [४० %] आहेत. इतिहासाच्या तासिकांचा पहीला क्रम आहे असे म्हणणारे शिक्षक [१४.२८ %] आहे.

याचा अर्थ असा की, शालेय वेळापत्रकात इतिहासाच्या तासिकाचा सातवा क्रम आहे असे म्हणणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे. वेळापत्रकात दुसरा आणि तिसरा तास इतिहासाचा आहे असे म्हणणा-याचा प्रतिसाद तुलनात्मकदृष्टया [redacted] कमी आहे. सातवा तास म्हणजे अखेरचा

तास इतिहासाचा आहे असे दिसते. इतिहासाच्या अध्यापनावर याचा निश्चित परिणाम होतो.

पुढील कोष्टकक्रमांक [४.१४] वरून तासिकांचा क्रम योग्य/अयोग्य याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.१४]

तासिकांचा क्रम योग्य अयोग्य

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | १२ | १७.१४ |
| २] | नाही | ५८ | ८२.८५ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.१४] हे स्पष्ट होते की, इतिहास विषयाच्या तासिकांचा क्रम बौध्दिक व मानसिक दृष्टया योग्य आहे असे म्हणणारे शिक्षक [१७.१४ %] आहेत. क्रम योग्य नाही म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या [८२.८५ %] आहे. मानसिक आणि बौध्दिकदृष्टया शेवटचे तास अयोग्य असतात. शेवटच्या तासांना विद्यार्थी कंटाळेले असतात. त्यामुळे त्यांचे इतिहास अध्यापनाकडे लक्ष लागणे कठीण आहे. वास्तव दुसरा किंवा तिसऱ्या तासास वेळापत्रकात इतिहास विषयाचा क्रम ठेवावा.

पुढील कोष्टक क्रमांक [४.१५] मध्ये विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार कोणते घटक बोजड वाटतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.१५]

वयोमानानुसार बोजड वाटणारे घटक


| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | क्रांत्या व युध्दे | ४३ | ६१.४२ |
| २] | परराष्ट्राचा इतिहास | १९ | २७.१४ |
| ३] | इयत्ता १० वी चा अभ्यासक्रम | ०६ | ०८.५७ |
| ४] | प्राचीन भारताचा अभ्यासक्रम | ०६ | ०८.५७ |
| ५] | सनावळ्यांची क्रमवारी | ०६ | ०८.५७ |
| ६] | घटक बोजड नाहीत | ११ | १५.७१ |
| ७] | अनुत्तरीत | १३ | १८.५७ |

वरील कोष्टकावरून[४.१५]हे स्पष्ट होते की, क्रांत्या व युध्दे विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार बोजड वाटतात, म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या [६१.४२] आहे. परकिय इतिहास अवघड आहे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या[२७.७१] आहे. हा मिळालेला प्रतिसाद इतिहासाच्या दृष्टीकोनातून बरोबर नाही. म्हणून विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार व बुध्दीला झेमतील असेच घटक अभ्यासक्रमात ठेवण्यात यावेत.

पुढील कोष्टक क्रमांक [४.१६] नुसार इतिहासाच्या अध्यापन पध्दती व शैक्षणिक साधना विषयी विचार करण्यात आलेला आहे.

# आलेख क्र. ४.१६ कोष्टक क्र. (४.१६)

## दैनंदिन अध्यापनातील अध्यापन पद्धती दर्शविणारा आलेख.



## ४.५ अध्यापनाच्या पध्दतीबाबत माहिती

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १८ ते ३० हया प्रश्नाव्दारे अध्यापन विषयक बाबींची माहिती मिळते. कोष्टक क्र.४.१६ मध्ये शिक्षक इतिहास शिकविण्यासाठी कोणत्या पध्दतींचा वापर करतात त्याची स्पष्टीकरण केले आहे.

कोष्टक क्र. [४.१६]

दैनंदिन अध्यापनातील अध्यापन पध्दती

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | कथनात्मक पध्दती | ४८ | ६८.५७ |
| २] | कथाकथन पध्दती | ०८ | ११.४२ |
| ३] | व्याख्यान पध्दती | १४ | २०.०० |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन [४.१६] हे स्पष्ट होते की, दैनंदीन अध्यापनासाठी वापरण्यात येणाऱ्या पध्दतीत कथनात्मक पध्दतीचा वापर करणारे शिक्षक [६८.५७ %] आहेत. व्याख्यान पध्दतीचा वापर करणारे [२०%] शिक्षक आहेत. आणि कथाकथन पध्दतीचा वापर करणारे शिक्षक [११.४२%] आहेत.

वरील अध्यापनाच्या पध्दतीपैकी इतिहासात कथनात्मक पध्दतीचा वापर मोठया प्रमाणात केला जातो. या पध्दतीला मिळालेला शिक्षकांचा प्रतिसाद योग्य आहे. या पध्दतीनंतर आवश्यक त्या ठिकाणी व्याख्याने आणि कथा कथन पध्दतीचा वापर केला जातो.

मुख्याध्यापक प्रश्नावलीत प्रतिसादक मुख्याध्यापकांना हा प्रश्न विचारला होता. [प्रश्न क्र.८] ३५% शिक्षक कथनात्मक पध्दतीचा वापर करतात असे त्यांनी मत व्यक्त केले आहे.

याचा अर्थ इतिहास शिक्षक ठराविक अध्यापन पध्दतीचा वापर करतात. या खेरीज इतिहासाच्या अन्य अनेक अध्यापन पध्दतीचा शिक्षक विचारच करत नाहीत ही बाब इतिहासाच्या दृष्टीने अयोग्य आहे.

खालील कोष्टक क्र.[४.१७] नुसार अध्यापनाचे वेळी विचारलेल्या प्रश्नाचे स्वरुप सांगितले आहे.

कोष्टक क्र. [४.१७]

अध्यापनाचे वेळी विचारलेल्या प्रश्नाचे स्वरुप

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | विचार प्रवर्तक | ४६ | ६५.७१ |
| २] | समिक्षणात्मक | ०८ | ११.४२ |
| ३] | उजळणीवजा | १८ | २५.७१ |
| ४] | समस्यात्मक | १३ | १८.५७ |
| ५] | संयोजनात्मक | ०९ | १२.८५ |
| ६] | प्रसंगानुसार | ०६ | ०८.५७ |

मागील कोष्टक क्र.[४.१७] वरून हे स्पष्ट होते की, विचारप्रवर्तक प्रश्न विचारणारे शिक्षक ६५.७१ % आहेत. उजळणीवजा प्रश्न विचारणारे शिक्षक[२५.७१ %]आहेत. समस्यात्मक प्रश्न विचारणारे शिक्षक[१८.५७]आहेत.

याचा अर्थ असा की, इतिहासामध्ये विचारप्रवर्तक प्रश्नांना मिळालेला प्रतिसाद योग्य आहे. वरील प्रतिसादाचा विचार करता, इतिहास अध्यापनामध्ये विचार प्रवर्तक प्रश्नांना महत्व आहे. अशा प्रकारचे प्रश्न विचारल्यामुळे विद्यार्थ्यांच्या तर्कशक्तीला चालना मिळते. विचार प्रवर्तक प्रश्ना प्रमाणेच इतर प्रश्न विचारण्यावरही शिक्षकांनी भर द्यावा असे अभ्यासकास वाटते.

पुढील कोष्टक क्र.[४.१८] वरून मुलांना स्वाध्याय देण्याचा हेतू कोणता याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.१८]

स्वाध्याय देण्याचा हेतू.

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | इतिहासाची गोडी लागण्यासाठी | २३ | ३२.८५ |
| २] | कठीण भाग समजण्यासाठी | १० | १४.२८ |
| ३] | घटकाचे दृढीकरणासाठी | २३ | ३२.२८ |
| ४] | अनुत्तरित | १४ | २०.०० |
| | | ७० | |

मागील कोष्टकावरुन [४. १८] हे स्पष्ट होते की, इतिहासाच्या पाठ्यापुस्तकाच्या आधारे स्वाध्याय देण्याचा हेतु इतिहासा विषयी गोडी लागणे असे सांगणारे [३२.८५ %] शिक्षक आहेत. कठीण भाग समजावुन देणे असे सांगणारे [१४.२८%] शिक्षक आहेत.

इतिहास हा विषय कंटाळवाणा आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने निरस वाटतो. विद्यार्थ्यांना इतिहासाविषयी गोडी लागण्यासाठी तसेच घटकाचे दृढीकरण करण्यासाठी स्वाध्याय देण्यात यावेत. हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

पुढील कोष्टक क्र. [४. १९] वरुन स्वाध्यायाचे मुल्यमापन करणे या प्रश्नाचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४. १९]

स्वाध्यायाचे मुल्यमापन.

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ५७ | ८१.४२ |
| २] | नाही | १३ | १८.५७ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन [४. १९] हे स्पष्ट होते की, स्वाध्याय तपासणारे शिक्षक [८१.४२%] आहेत. स्वाध्याय न तपासणारे शिक्षक [१८.५७%] आहेत.

वरील दोन्ही विभागाच्या प्रतिसादावरून लक्षात येते की, स्वाध्याय तपासणा-या शिक्षकांचा प्रतिसाद मोठया प्रमाणात आहे. हे इतिहासाच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

पाठयपुस्तकाच्या आधारे दिलेले स्वाध्याय तपासण्यात यावेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना लिहिण्याची सवय लागते व घटकाचे दृढीकरण होते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची प्रगती आजमावता येते.

पुढील कोष्टक क्र. [४. २०] नुसार अध्यापनात कोणकोणती शैक्षणिक साधने वापरतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४. २०]

अध्यापनात वापरण्यांत येणारी शैक्षणिक साधने

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| | [अ] संशोधनात्मक | | |
| १] | चर्चा | ५५ | ७८. ५७ |
| २] | परिसंवाद | १५ | २१.४२ |
| | | ७० | १००.०० |
| | [ब] क्रियात्मक | | |
| १] | नाटयीकरण | १६ | २२. ८५ |
| २] | पोवाडा | ५० | ७१. ४२ |
| ३] | प्रकल्प | ०२ | ०२. ८५ |
| ४] | कृतिसत्र | ०२ | ०२. ८५ |
| | | ७० | |

मागील कोष्टकावरुन [४.२०] हे स्पष्ट होते की, अध्यापनात संशोधनात्मक साधनामध्ये चर्चा [७८.५७%] व परिसंवादाचा वापर करणारे शिक्षक [२१.४२%] अधिक आहेत.

वरील प्रतिसादाचा विचार करता वर्गात इतिहासाबाबत चर्चा करणाऱ्या शिक्षकांची संख्या जास्त आहे. इतिहास हा विषय चर्चा पध्दतीने शिकविल्यास विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे समजतो. हे मुलांच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

इतिहास अध्यापनात क्रियात्मक साधनामध्ये पोवाडा [७१.४२ %] व नाट्यीकरणाचा वापर करणारे शिक्षक [२२.८५ %] अधिक आहेत. इतिहासातील वीर पुरुषाचे पोवाडे ऐकण्यास मुलांना आनंद वाटतो. यामुळे मुलांच्या दृष्टीने पोवाड्यांचा वापर करणे आवश्यक आहे.

खालील कोष्टक क्र.[४.२१] वरुन शैक्षणिक साधने वापराबाबत येणाऱ्या अडचणीचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.२१]

शैक्षणिक साधने वापराबाबत येणाऱ्या अडचणी.

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ४८ | ६८.५७ |
| २] | नाही | २२ | ३१.४२ |
| | | ७० | |

वरील कोष्टकावरुन [४.२१] हे स्पष्ट होते की, इतिहास अध्यापनात शैक्षणिक साधने वापराबाबत येणाऱ्या अडचणी आहेत असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या [६८.५७ %] आहे. साधने वापरण्यासाठी अडचणी येत नाहीत असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या [३१.४२%] आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, शैक्षणिक साधने वापराबाबत अडचणी सांगणा-या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे.

इतिहासातील शैक्षणिक साधने वापरण्यासाठी येणा-या अडचणी शाळेने दूर करणे आवश्यक आहे. यामुळे जास्तीत जास्त शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करू शकतील.

मुख्याध्यापकांना या संदर्भात प्रश्न विचारला होता [प्र.क्र.८] मुख्याध्यापकांचा प्रतिसाद खालीलप्रमाणे आहे.

शाळेतील ४०% शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करतात, व काही अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागते असा प्रतिसाद मुख्याध्यापकांनी दिला आहे.

खालील कोष्टक क्र.[४.२२] वरून साधने वापरण्यासाठी प्रत्यक्ष अडचणी कोणत्या येतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.२२]

शैक्षणिक साधने वापरात येणा-या अडचणीचे स्वरूप

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | साधने उपलब्ध नाहीत | ३४ | ४८.५७ |
| २] | वेळ कमी पडतो | २६ | ३७.१४ |
| ३] | साधने वापराचे प्रशिक्षण नाही | १७ | २४.२८ |
| ४] | साधने ठेवण्यासाठी खोली नाही | २२ | ३१.४२ |
| ५] | अनुत्तरित | २१ | ३०.०० |

मागील कोष्टकावरून [४.२२] असे स्पष्ट होते की,
शैक्षणिक साधने उपलब्ध नसणे असे सांगणारे [४८.५७%] शिक्षक आहेत.
वेळ कमी पडतो म्हणणारे शिक्षक [३७.१४%] आहेत. साधनासाठी
वेगळी खोली नाही म्हणणारे शिक्षक [३१.४२%] आहेत. या शैक्षणिक
साधने वापरा मागील अडचणी आहेत. यातील प्रमुख अडचण म्हणजे
साधने उपलब्ध नाहीत हे आहे.

शैक्षणिक साधने मुख्याध्यापकांनी उपलब्ध करून द्यावीत. काही
शैक्षणिक साधने जमा करावीत. काही शैक्षणिक साधन विद्यार्थ्यांच्या
मदतीने तयार करून द्यावीत. शैक्षणिक साधने वापरण्यांत अडचणी येत
असतील तर जादा वेळ देण्यात यावा.

पुढील कोष्टक क्र.[४.२३] वरून साहित्य ठेवण्यासाठी
वेगळी खोली आहे किंवा नाही याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.२३]

शैक्षणिक साहित्यासाठी स्वतंत्र खोली

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ३० | ४२.८५ |
| २] | नाही | ४० | ५७.१४ |
| | | ७० | १००.०० |

मागील कोष्टकावरून [४.२३] हे स्पष्ट होते की, शाळेत इतिहासाचे साहित्य ठेवण्यासाठी वेगळी खोली आहे असे म्हणणारे शिक्षकांचा प्रतिसाद [४२.८५%] आहे. शाळेत वेगळी खोली नाही म्हणणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [५७.१४%] आहे.

याचा अर्थ असा की, शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी वेगळी खोली नाही म्हणणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद मोठया प्रमाणात आहे. इतिहास अध्यापनाच्या दृष्टीकोनातून ही बाब अयोग्य आहे.

पुढील कोष्टक क्र.[४.२४] नुसार अध्यापनात स्थानिक इतिहासाचा उपयोग करावा किंवा नाही याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.२४]

अध्यापनात स्थानिक इतिहासाचा उपयोग

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ३३ | ४७.१४ |
| २] | नाही | ३७ | ५२.८५ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.२४] हे स्पष्ट होते की, अध्यापनात स्थानिक इतिहासाचा उपयोग करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [४७.१४%] आहे. उपयोग न करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [५२.८५%] आहे.

याचा अर्थ असा की, अध्यापनात स्थानिक इतिहासाचा उपयोग न करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद मोठया प्रमाणात आहे. हा मिळालेला

प्रतिसाद इतिहासाच्या दृष्टीकोनातुन समाधानकारक नाही. इतिहासाच्या अध्यापनात स्थानिक इतिहासाचा उपयोग करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थी ज्या ठिकाणी राहतात तेथील इतिहासाची माहिती त्यांना मिळते.

खालील कोष्टक क्र.[४.२५] मध्ये पाठय पुस्तकांचा उपयोग अध्यापनात किती शिक्षक करतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.२५]

वर्गात पाठयपुस्तकांचा उपयोग करणे

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ३३ | ४७.१४ |
| २] | नाही | ३७ | ५२.८५ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.२५] हे स्पष्ट होते की, वर्गात अध्यापनासाठी पाठय पुस्तकांचा उपयोग करणारे शिक्षक [४७.१४%] आहेत. उपयोग न करणारे शिक्षक [५२.८५%] आहेत.

यावरून असे सांगता येईल की, इतिहासाच्या पाठयपुस्तकांचा अध्यापनाच्या वेळी उपयोग करणारे शिक्षक कमी आहेत. ~~हा शिक्षकांचा प्रतिसाद योग्य आहे~~, ~~कारण~~ वर्गात अध्यापनासाठी इतिहास पाठय-पुस्तकाचा उपयोग करता येत नाही. भाषा विषयातच वर्गात पाठयपुस्तकांचा वापर केला जातो.

खालील कोष्टक क्र.[४.२६] नुसार वर्गात पाठ्यपुस्तक कोणते घटक शिकविण्यासाठी वापरतात याचे शिक्षकांनी मत व्यक्त केले आहे.

कोष्टक क्र.[४.२६]

वर्गात पाठ्यपुस्तक वापराचे स्वरूप

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | कठीण भागावर प्रश्न विचारण्यासाठी | १० | १४.२८ |
| २] | कठीण भागावर क कथन करण्यासाठी | ११ | १५.७१ |
| ३] | मुद्देसूद मांडणी करण्यासाठी | १० | १४.२८ |
| ४] | संदर्भ घटनांची माहिती देण्यासाठी | ३९ | ५५.७१ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.२६] स्पष्ट होते की, इतिहास पाठ्यपुस्तकांचा संदर्भ घटनांसाठी माहिती देण्यासाठी उपयोग करणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [५५.७१%] आहे. कठीण भागावर कथन करणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [१५.७१%] आहे. घटनांची माहिती देण्यासाठी पाठ्यपुस्तकांचा उपयोग केला जातो. इतिहासात विविध घटनांच्या संदर्भात माहिती द्यावी लागते. त्याशिवाय इतिहासाचे अध्यापन करणे अशक्य आहे. यादृष्टीने हा प्रतिसाद योग्य वाटतो.

खालील कोष्टक क्र. [४.२७] नुसार पाठ्यपुस्तकांतील त्रुटींचा विचार करण्यांत आलेला आहे.

कोष्टक क्र. [४.२७]

पाठ्यपुस्तकांतील त्रुटी.

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ३७ | ५२.८५ |
| २] | नाही | ३३ | ४७.१४ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून स्पष्ट होते की, पाठ्यपुस्तकात त्रुटी आहेत म्हणणाऱ्या शिक्षकाचे प्रमाण [५२.८५ %] आहे. पाठ्यपुस्तकांत त्रुटी नाहीत म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण [४७.१४%] आहे.

यावरून असे निदर्शनास येते की, पाठ्यपुस्तकात त्रुटी आहेत म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या जास्त आहे.

इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने विचार करता पाठ्यपुस्तकातील त्रुटी मारक आहेत. या त्रुटी कमी करणे जरुरीचे आहे.

इतिहासाचे अध्यापन करण्यापूर्वी शिक्षकाने पाठ्यपुस्तकातील त्रुटींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

खालील कोष्टक क्र.[४.२८] मध्ये पाठयपुस्तकाच्या दोषाबाबत विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.२८]

पाठयपुस्तकांतील दोषाचे स्वरूप

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १] | विद्यार्थ्यांच्या वयोमाना-नुसार घटक बोजड ~~असे~~ वाटतात. | ६७ | ९५.७१ |
| २] | पाठयपुस्तकातील इ.सन. व घटकाचा क्रम बरोबर नाहीत | ०३ | ०४.२८ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन [४.२८] स्पष्ट होते की, पाठयपुस्तकातील घटक बोजड आहेत असे म्हणणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [९५.७१ %] आहे. पाठयपुस्तकातील घटकांचा क्रम व इसवी सन बरोबर नाहीत म्हणणारे शिक्षक [४.२८ %] आहेत.

वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता पाठयपुस्तकांतील घटक बोजड वाटतात म्हणणारे शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने ही बाब चांगली आहे.

४.६ शैक्षणिक साधनाविषयी माहिती:

प्रश्न क्र. ३१ ते ३६ वरुन शैक्षणिक साधना विषयी माहिती मिळते. इतिहासाच्या अध्यापनासाठी शिक्षक कोणकोणती शैक्षणिक साधने वापरतात याची कल्पना येते. शैक्षणिक साधनामुळे एखादा प्रसंग, घटना, चित्रे हुबेहुब मुलांच्या डोळ्यासमोर उभा करता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ति व निरीक्षण शक्ती वाढते, विद्यार्थी चिकित्सक बनतात. इतिहासाचे अध्यापन परिणामकारक होण्यासाठी शिक्षक खालील शैक्षणिक साहित्याचा वापर करतात असे आढळून येते, ते खालील कांही कोष्टकांत नमूद केले आहे.

कोष्टक क्र.[४.२९]

अध्यापनात खादी फलकांचा उपयोग

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | खादी फलकांचा वापर करणारे शिक्षक | ३९ | ५५.७१ |
| २] | फलकांचा वापर न करणारे शिक्षक | ३१ | ४४.२८ |
| | | ७० | १००.०० |


वरील कोष्टकावरुन [४.२९] हे स्पष्ट होते की, खादी फलक हे शैक्षणिक साधन म्हणून वापर करणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [५५.७१%] आहे. वापर न करणारे शिक्षकांचा प्रतिसाद [४४.२८ %] आहे.

आलेख क्र. ४.३० कोष्टक क्रमांक ४.३०

नकाशे, आराखडे, चित्रे, इ. विषयी माहिती दर्शविणारा तक्ता

[१] वापर करणारे

[२] वापर न करणारे



या प्रतिसादावरुन असे स्पष्ट होते की, खादी फलक वापर करणारे शिक्षक मोठ्या प्रमाणात आहेत. हा मिळालेला प्रतिसाद इतिहासाच्या अध्यापनाच्या दृष्टीने योग्य आहे. कारण खादी फलकाच्या साहयाने अनेक चित्रे, आकृत्या, नकाशांचा वापर करणे शक्य होते.

खालील कोष्टक क्र.[४.३०] वरुन इतिहास अध्यापनात वापरात येणा-या आराखडे व चित्रांचा विचार करण्यांत आलेला आहे.

कोष्टक क्र. [४.३०]

अध्यापनात आराखडे व चित्रांचा वापर

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | वापर करणारे | ६४ | ९१.४२ |
| २] | वापर न करणारे | ०६ | ०८.५७ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन [४.३०] स्पष्ट होते की, आराखडे व चित्रे यांचा अध्यापनात वापर करणारे शिक्षक [९१.४२%] आहेत. वापर न करणारे शिक्षक [८.५७%] आहेत.


वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता इतिहास अध्यापनात शैक्षणिक साधन म्हणून आराखडे व चित्रे इत्यादिंचा वापर करणा-या शिक्षकांचा प्रतिसाद योग्य आहे. त्यामुळे घटक समजावून देणे सोयीचे जाते.

आलेख क्रं. ४.३७ कोष्टक क्रमांक. ४.३७

इतिहास अध्यापनात कालपट व वंशवृक्ष वापर.

[1] वापर करणारे शिक्षक

[2] वापर न करणारे शिक्षक.



पुढील कोष्टक क्र.[४.३१] वरून इतिहास अध्यापनामध्ये किती शिक्षक कालपट व वंशवृक्ष यांचा विचार करतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.३१]

अध्यापनात कालपट व वंशवृक्ष याचा वापर

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | वापर करणारे शिक्षक | ५७ | ८१.४२ |
| २] | वापर न करणारे शिक्षक | १३ | १८.५७ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.३१] असे स्पष्ट होते की, अध्यापनात कालपट व वंशवृक्ष यांचा वापर करणारे शिक्षक [८१.४२%] आहेत. कालपट व वंशवृक्ष यांचा अध्यापनात वापर न करणारे शिक्षक [१८.५७%] आहेत.

वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता अध्यापनात कालपट व वंशवृक्ष यांचा वापर करणारे शिक्षक मोठ्या प्रमाणात आहेत. हा मिळालेला प्रतिसाद इतिहासाच्या दृष्टीने योग्य आहे. मूर्तिमंत इतिहास विद्यार्थ्यांपुढे त्यामुळे उभा करता येतो.

पुढील कोष्टक क्र.[४.३२] मध्ये शैक्षणिक साधन म्हणून भिंती पत्रके व बाहुल्या यांचा वापर किती शिक्षक करतात याचे विश्लेषण केले आहे.

**कोष्टक क्र. [४. ३२]**

**भिंती पत्रके व बाहुल्यांचा वापर**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १] | वापर करणारे | ५१ | ७२.८५ |
| २] | वापर न करणारे | १९ | २७.१४ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४. ३२] स्पष्ट होते की, अध्यापनात भिंतीपत्रके व बाहुल्यांचा वापर करणारे शिक्षक [७२.८५%] आहेत. अध्यापनात भिंतीपत्रके व बाहुल्यांचा वापर न करणारे शिक्षक [२७.१४%] आहेत.

वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता या शैक्षणिक साधनांचा वापर करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद शैक्षणिक दृष्टया योग्य आहे.

पुढील कोष्टक क्र. [४. ३३] इतिहास मंदीरात टेप रेकॉर्डर, रेडिओ यांच्या उपलब्धते बाबत शिक्षकांनी मत व्यक्त केले आहे.

कोष्टक क्र. [४.३३]

इतिहास मंदीरात टेप रेकॉर्डर, रेडिओ साधने यांची उपलब्धता

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसाद चे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ३० | ४२.८५ |
| २. | नाही | ४० | ५७.१४ |

वरील कोष्टक क्र. [४.३३] वरुन स्पष्ट होते की, इतिहास मंदिरात टेपरेकॉर्डर व रेडिओ ही शैक्षणिक साधने आहेत म्हणणा-या शिक्षकांची संख्या [४२.८५ टक्के ] आहे. इतिहास मंदीरात शैक्षणिक साधने नाहीत म्हणणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [ ५७.१४ टक्के] आहे.

दोन्ही प्रतिसादांचा विचार करता इतिहास मंदीरात वरील शैक्षणिक साधने नाहीत म्हणणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे. हे इतिहासाच्या दृष्टीने योग्य नाही.

प्रत्येक शाळेमध्ये इतिहास मंदीरात वरील शैक्षणिक साधने ठेवणे आवश्यक आहेत. शैक्षणिक साधने असल्याशिवाय त्याचा अध्यापनात वापर करता येत नाही.

खालील कोष्टक क्र. [४.३४] मध्ये इतिहासाच्या ऐतिहासिक जुन्या साधनांचा वापर किती शिक्षक करतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.३४]

ऐतिहासिक जुने अवशेष कागदपत्रे इ.

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ५७ | ८१.४२ |
| २. | नाही. | १३ | १८.५७ |
| | | ७०. | |

मागील कोष्टकावरून [४.२४] स्पष्ट होते की, शैक्षणिक साधनामध्ये जुने अवशेष व कागदपत्र आहेत. असे म्हणणारे शिक्षक [८१.४२ टक्के]आहेत. जुने अवशेष व कागदपत्र नाहीत म्हणणारे शिक्षक [१८.५७ टक्के]आहेत.

वरील प्रतिसादांचा विचार करता ऐतिहासिक अवशेष व कागदपत्रे आहेत म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे.

शाळेत ~~शैक्षणिक~~ उपनिर्दिष्ट साधने व असतील तरच शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करु शकतील. ऐतिहासिक जुने अवशेष व कागदपत्रे इतिहासात वापर केल्यास अध्यापन चांगले होते. इतिहासाचे वास्तव दर्शन घडविता येते.

पुढील कोष्टक क्र. [ ४.२५ ] मध्ये ग्रंथालयाबाबत विचार करण्यांत आला आहे.

४.७ ग्रंथालयाविषयी माहिती. :

प्रश्न क्रमांक ३७ ते ४१ वरून ग्रंथालयाविषयी माहिती मिळते. ग्रंथालयात पुस्तके असतील तरच विद्यार्थी आणि शिक्षक त्याचा वापर करु शकतात. ग्रंथालयामध्ये दैनिके, नियतकालिके, इतिहासाची पुस्तके असणे आवश्यक आहे. इतिहासाचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी शिक्षक ग्रंथालयातील पुस्तकांचा, दैनिकांचा किती वापर करतात हे पुढील कोष्टकांत नमूद केले आहे.

कोष्टक क्र. [४.२५ ]

इतिहासाचे ग्रंथालय

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ११ | १५.७१ |
| २. | नाही. | ५९ | ८४.२८ |
| | | ७० | |

मागील कोष्टकावरून [ ४.३५] स्पष्ट होते की, शाळेत वेगळे इतिहास ग्रंथालय आहे म्हणणारे शिक्षक [ १५.७१ टक्के]आहेत. इतिहासाचे वेगळे ग्रंथालय नाही म्हणणारे शिक्षक [ ८४.२८ टक्के ] आहेत. वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता शाळेत वेगळे ग्रंथालय नाही म्हणणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे. शाळेमध्ये वेगळे ग्रंथालय असणे आवश्यक आहे.

त्याशिवाय इतिहास विषयाची गोडी विद्यार्थ्यांना लावता येणे कठीण आहे. निदान इतिहास विषयाची वेगळी कपाटे असणे आवश्यक आहे.

खालील कोष्टक क्र. [४.३६ ] वरून शाळेच्या ग्रंथालयात पुस्तकांची संख्या किती आहे याबाबत विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.३६ ]

ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ० - ९ | ०७ | १० |
| २. | १० - ४९ | २४ | ३४.२८ |
| ३. | ५० - ९९ | १६ | २२.८५ |
| ४. | १०० - १४९ | ०६ | ८.५७ |
| ५. | १५० - १९९ | ०६ | ८.५७ |
| ६. | २०० - २५९ | ०४ | ५.७१ |
| ७. | अनुत्तरित | ०८ | ११.४२ |
| | | ७० | |

वरील कोष्टकावरून [ ४.३६ %] हे स्पष्ट होते की, शाळेच्या ग्रंथालयात १०-४९ पुस्तके आहेत म्हणणारे शिक्षक [ ३४.२८ %] आहेत.

याचा अर्थ ब-याच शाळामध्ये जास्तीत जास्त ५० पेक्षा अधिक इतिहास विषयावरील पुस्तके नाहीत. इतिहास विषयाची गोडी विद्यार्थ्यांत निर्माण करण्यासाठी ही संख्या वाढणे जरुरीचे आहे.

खालील कोष्टक क्र. [४.३७] वरुन शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तकांचा किती टक्के विद्यार्थी पुरवणी वाचनासाठी वापर करतात याबाबत शिक्षकांनी मत व्यक्त केले आहे.

कोष्टक क्र. [४.३७]

पुरवणी वाचनासाठी पुस्तकांचा उपयोग

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २१ | ३० |
| २. | नाही | ४९ | ७० |
| | | ७० | |

वरील कोष्टकावरुन [४.३७] स्पष्ट होते की, पुरवणी वाचनासाठी ग्रंथालयातील पुस्तकांचा विद्यार्थी उपयोग करतात म्हणणा-या शिक्षकांची संख्या [ ३० % ] आहे. विद्यार्थी पुरवणी वाचनासाठी पुस्तकांचा उपयोग करत नाहीत म्हणणारे शिक्षक [ ७० % ] आहेत. विद्यार्थी पुरवणी वाचनासाठी पुस्तकांचा वापर करत नाहीत. इतिहास अध्यापनाच्या दृष्टिने ही बाब अयोग्य आहे.

विद्यार्थ्यांनी इतिहासाचे ज्ञान मिळविण्यासाठी, पुरवणी वाचनासाठी ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग करणे आवश्यक आहे.

पुढील कोष्टक क्र. [ ४.३८ ] मध्ये शाळेच्या ग्रंथालयामध्ये कोणती नियतकालिके आहेत याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [ ४.३८ ]

गृंथालयातील नियतकालिके

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सहयाद्री | १८ | २५.७१ |
| २. | लोकप्रभा | १० | १४.२८ |
| ३. | छावा | १३ | १८.५७ |
| ४. | जत्रा | ०८ | ११.४२ |
| ५. | इतिहास विशेषांक | ४६ | ६५.७१ |

वरील कोष्टकावरून [ ४.३८ ] स्पष्ट होते की, शाळेच्या गृंथालयात इतिहास विशेषांक नियतकालिके आहे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या [६५.७१ %] आहे. शाळेच्या, गृंथालयात सहयाद्री आहे म्हणणारे शिक्षक [ २५.७१ % ] आहेत. शाळेच्या गृंथालयामध्ये छावा आहे म्हणणारे शिक्षक [ १८.५७ % ] आहेत.

याचा अर्थ असा की, शाळेच्या गृंथालयात इतिहासाच्या नियतकालिकांची संख्या जास्त आहे. इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे. सर्वच शाळामध्ये इतिहास विशेषांक पाहिजे . तसेच गृंथालयामध्ये इतिहासाची इतर नियतकालिके ठेवणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घडामोडीचे ज्ञान होत असते.

पुढील कोष्टक क्र. [ ४.३९ ] वरून शाळेच्या गृंथालयात कोणती दैनिके आहेत याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.३९ ]

शालेय ग्रंथालयातील दैनिके

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठवाडा | ३३ | ४७.१४ |
| २. | लोकमत | ४० | ५७.१४ |
| ३. | सकाळ | १८ | २५.७१ |
| ४. | महाराष्ट्र टाईम्स | १६ | २२.८५ |
| ५. | तरुण भारत | १३ | १८.५७ |

वरील कोष्टकावरुन [ ४.३९ ] स्पष्ट होते की, शाळेच्या ग्रंथालयात 'लोकमत' आहे म्हणणारे [५७.१४ % ] शिक्षक आहेत. शाळेच्या ग्रंथालयात 'मराठवाडा' हे क दैनिक आहे म्हणणारे शिक्षक [४७.१४ % ] आहेत. 'सकाळ' आहे म्हणणारे शिक्षक [ २५.७१ %] आहेत.

याचा अर्थ असा की, शाळेच्या, ग्रंथालयात 'लोकमत,' दैनिक आहे म्हणणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे. कारण या विभागातील ते प्रमुख दैनिक आहे.

'लोकमत' या दैनिकामध्ये प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम येतो. त्यासाठी दैनिक लोकमत ग्रंथालयात असणे आवश्यक आहे. कारण याचा फायदा विद्यार्थ्यांना होतो.

पुढील कोष्टक क्र. [ ४.४० ] मध्ये अध्यापनात दैनिकांचा व नियतकालिकांचा वापर किती प्रतिसाद शिक्षक करतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [ ४.४० ]

अध्यापनात दैनिकांचा व नियतकालिकांचा उपयोग

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ५७ | ८१.४२ |
| २. | नाही. | १३ | १८.५७ |
| | | ७० | |

वरील कोष्टकावरून ] ४.४० ] स्पष्ट होते की, दैनिकांचा व नियतकालिकांचा अध्यापनात वापर करणारे शिक्षक [ ८१.४२ % ] आहेत. अध्यापनात दैनिकांचा व नियतकालिकांचा उपयोग न करणारे शिक्षक [ १८.५७ % ]आहेत.

याचा असा अर्थ असा की, अध्यापनात दैनिकांचा व नियतकालिकांचा वापर करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने योग्य आहे.

इतिहास अध्यापनात दैनिकांचा व नियतकालिकांचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना जागतिक घडामोडीचे ज्ञान मिळते.

पुढील कोष्टक क्र. [ ४.४१ ] मध्ये दैनिकांचा व नियतकालिकांचा वापर शिक्षक किती प्रमाणात करतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.४१]

निय़तकालिके व दैनिके यांच्या वापराचे प्रमाण

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अंशत: | ०३ | ४.२८ |
| २. | कमी प्रमाणात | १५ | २१.४२ |
| ३. | पूर्णपणे | ५० | ७१.४२ |
| ४. | अभिप्राय नाही. | ०२ | २.८५ |
| | | ७० | |

वरील कोष्टकावरुन [ ४.४१ ] स्पष्ट होते की, इतिहास अध्यापनात दैनिकांचा व नियतकालिकांचा पूर्णपणे उपयोग करणारे शिक्षक [ ७१.४२ % ] आहेत. कमी प्रमाणात उपयोग करणारे शिक्षक [ २१.४२ % ] आहेत. अंशत: उपयोग करणारे शिक्षक [ ४.२८ % ] आहेत.

याचा अर्थ असा की, नियतकालिके आणि दैनिके यांचा इतिहास अध्यापनात पूर्णपणे उपयोग करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. जास्तीत जास्त शिक्षक इतिहास अध्यापनामध्ये दैनिकांचा व नियतकालिकांचा उपयोग करतात हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

पुढील कोष्टक [ ४.४२ ] मध्ये शिक्षक नियतकालिके व दैनिके यांचा वापर अध्यापनात कसा करतात याचे विश्लेषण केले आहे.

**कोष्टक क्र. [ ४.४२ ]**

**नियतकालिके व दैनिके यांच्या वापराचे स्वरूप**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मुलांना वाचण्यासाठी देतो | १७ | २४.२८ |
| २. | दैनंदिन अध्यापनाकरिता वापर करतो | ५५ | ७८.५७ |
| ३. | सामाजिक घटनांची माहिती देण्यासाठी | १२ | १७.१४ |
| ४. | ऐतिहासिक लेखन किंवा वाचन करण्यासाठी | ०६ | ८.५७ |

वरील कोष्टकावरून [ ४.४२ ] स्पष्ट होते की, नियतकालिके व दैनिके यांचा वापर दैनंदिन अध्यापनाचे वेळी बहुतांशी शिक्षक [७८.५७ %] करतात.

याचा अर्थ असा की, दैनंदिन अध्यापनासाठी वापर करणारे शिक्षकांचा प्रतिसाद चांगला आहे.

शिक्षकांनी दैनंदिन अध्यापनामध्ये दैनिकांचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना घटक चांगल्याप्रकारे समजतो. म्हणून दैनिकांचा व नियतकालिकांचा वापर करणे आवश्यक आहे.

पुढील कोष्टक [ ४. ४३ ] नुसार अध्यापनात विद्यार्थ्यांच्या स्वयंस्फूर्तिस वाव किती शिक्षक देतात याबाबत मत व्यक्त केले आहे.

कोष्टक क्र. [ ४.४३ ]

अध्यापनात स्वयंकृतिस वाव

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ३३ | ४७.१४ |
| २. | नाही | ३७ | ५२.८५ |
| | | ७० | |

वरील कोष्टकावरुन [ ४.४३ ] स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतिस वाव देणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [ ४७.१४ % ] आहे. विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतिस वाव न देणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [ ५२.८५ % ] आहे.

याचा अर्थ असा की, विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतिस वाव देणाऱ्या शिक्षकांची संख्या कमी आहे. वाव न देणाऱ्या शिक्षकांची संख्या जास्त आहे. इतिहास अध्यापनाच्या दृष्टिने ही बाब समाधानकारक नाही.

विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतिला वाव दिल्यास मुलामध्ये इतिहासाविषयी गोडी निर्माण करता येते. शाळेत प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतीस वाव देणे आवश्यक आहे.

पुढील कोष्टकांत [ ४.४४ ] मध्ये विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतिस वाव देण्यासाठी वैयक्तिक लक्ष दिले जाते का याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.४४]

स्वयंकृतीस वाव देण्यासाठी वैयक्तिक लक्ष

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ३० | ४२.८६ |
| २. | नाही | ४० | ५७.१४ |
| | | ७० | |

वरील कोष्टकावरून [ ४.४४ ] स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतिस वाव देताना वैयक्तिक लक्ष देण्यात येते म्हणणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [ ४२.८६ % ] आहे. वैयक्तिक लक्ष नाही म्हणणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [ ५७.१४ % ] आहे.

वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक लक्ष देतो म्हणणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद योग्य आहे. परंतु जास्तीतजास्त शिक्षकांनी वैयक्तिक लक्ष दिले पाहिजे. कारण वैयक्तिक लक्ष दिल्या शिवाय व्यक्तिभिन्नता ध्यानात येणार नाही आणि स्वयंकृतिस चालना मिळणे कठीण जाईल.

### ४.८ अभ्यासपूरक कार्यक्रमाविषयी माहिती. :

प्रश्न क्र. ४७ ते ५२ वरून अभ्यासपूरक कार्यक्रमाविषयी माहिती मिळते. शाळेत इतिहास विषयाची गोडी निर्माण करण्यासाठी कोणते सांस्कृतिक कार्यक्रम, ऐतिहासीक सहली, पोवाडे, गायन, लेखन स्पर्धा ~~कोणकोणत्या~~ आयोजित केल्या जातात ते पुढील कांही कोष्टकांत नमूद केले आहे.

कोष्टक क्र. [ ४.४५ ]

सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ४९ | ७० |
| २] | नाही | २१ | ३० |
| | | ७० | १०० |

वरील कोष्टकावरून [४.४५] स्पष्ट होते की, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणाऱ्या शिक्षकांची संख्या [७०%] आहे. सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित न करणाऱ्या शिक्षकांची संख्या [३०%] आहे.

वरील दोन्ही प्रतिसादावरून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणाऱ्या शिक्षकांची संख्या जास्त आहे. इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास होण्यास ही बाब उपयुक्त आहे.

मुख्याध्यापकांना प्रश्नावलीमध्ये हा प्रश्न विचारला होता. [प्र.क्र.७] प्रस्तुत मुख्याध्यापकाकडून मिळालेला प्रतिसाद खालील प्रमाणे आहे. [शिक्षकाकडून आयोजित केलेल्या कार्यक्रमा बाबतचा]

१] इतिहास विषयक तज्ज्ञाचे व्याख्यानाचे आयोजन.

२] इतिहासातील महत्वाच्या व्यक्तींच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करणे.


४] नाटके, पोवाडे, कार्यक्रम साजरे करणे.

आलेख क्र. ४.४६ कोष्टक क्रमांक ४.४६

ऐतिहासिक स्थळे पाहण्यासाठी शैक्षणिक सहलींचे आयोजन.

[1] होय.

[2] नाही.



हा मिळालेला प्रतिसाद चांगला आहे. ५०% शिक्षक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करतात असे मुख्याध्यापकांनी मत व्यक्त केले आहे.

खालील कोष्टकांत [४.४६] मुलांना ऐतिहासिक माहिती मिळण्यासाठी सहलीचे आयोजन केले जाते किंवा नाही याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.४६]

ऐतिहासिक सहलीचे आयोजन

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय | ६८ | ९७.१४ |
| २) | नाही | ०२ | ०२.८५ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.४६] स्पष्ट होते की, ऐतिहासिक सहलीचे आयोजन करणारे शिक्षक [९७.१४%] आहेत. इतिहासाच्या सहलीचे आयोजन न करणारे शिक्षक [०२.८५%] आहेत.

याचा अर्थ असा की, इतिहासाच्या सहलीचे आयोजन करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने ही बाब समाधानकारक आहे. कारण प्रत्यक्ष अनुभूतीने इतिहासामध्ये अवलोकन केल्यास विद्यार्थ्यांना ज्ञान मिळते.

पुढील कोष्टक [४.४७] नुसार सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणे या प्रश्नाचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.४७]

सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे भारतीय संस्कृतिचे दर्शन घडविणे.

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ६६ | ९४.२८ |
| २] | नाही | ०४ | ०५.७१ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन [४.४७] स्पष्ट होते की, भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी पोवाडा, लोकगीते, लोकनृत्ये यांचे आयोजन करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [९४.२८%] आहे. आयोजित न करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद [०५.७१%] आहे.

याचा अर्थ असा की, भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी अनेक शिक्षक कार्यक्रम आयोजित करतात. हा मिळालेला प्रतिसाद विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

राष्ट्राभिमान निर्माण करण्यासाठी भारतीय संस्कृतीचे दर्शन होणे जरुरीचे आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे शाळामध्ये हे कार्य घडवून आणता येते. इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने ही बाब स्तुत्य आहे.

पुढील कोष्टक क्र.[४.४८] वरुन शाळेमध्ये इतिहासातील कोणकोणत्या स्पर्धांचे आयोजन केले जाते याचे स्पष्टीकरण केले आहे. हा प्रश्न होय नाही स्वरुपाचा आहे.

कोष्टक क्र. [४.४८]

शाळातील विविध स्पर्धांचे आयोजन.

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ४९ | ७० |
| २] | नाही | २१ | ३० |
| | | ७० | १०० |

वरील कोष्टकावरून [४.४८] स्पष्ट होते की, शाळेमध्ये इतिहास विषयावर लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, हस्तलिखित स्पर्धा आयोजित करणाऱ्या शिक्षकांची संख्या [७०%] आहे. स्पर्धा आयोजित न करणाऱ्या शिक्षकांची संख्या [३०%] आहे.

वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता इतिहास विषयातील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद चांगला आहे. हा प्रतिसाद विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

विविध स्पर्धा आयोजित केल्याने विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असलेल्या सुप्त गुणांचा विकास होतो. त्याचप्रमाणे इतिहास विषयाची गोडी निर्माण करता येते.

पुढील कोष्टकात [४.४९] मध्ये इतिहास विषयातील वक्त्यांच्या आयोजित केलेल्या भाषणां बाबत विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.४९]

प्रसिध्द वक्त्यांची इतिहास विषयावरील भाषणाचे आयोजन

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ३३ | ४७.१४ |
| २] | नाही | ३७ | ५२.८५ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टकावरून [४.४९] हे स्पष्ट होते की, वक्त्यांची भाषणे आयोजित करणाऱ्या शिक्षकांची संख्या [४७.१४%] आहे. भाषणे आयोजित * न करणाऱ्या शिक्षकांची संख्या [५२.८५%] आहे.

वरील प्रतिसादांचा विचार करता भाषणे आयोजित न करणाऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य नाही.

शाळेत इतिहास विषयाचा भाषणे आयोजित करून मुलांमध्ये इतिहास विषयाची गोडी निर्माण करणे आवश्यक आहे.

पुढील कोष्टकांत [४.५०] शाळेत शिक्षक कोणकोणती व्याख्याने आयोजित करतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४. ५०]

वक्त्यांच्या आयोजित केलेल्या व्याख्यानाचे स्वरूप

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १] | वीर पुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या | २८ | ४० |
| २] | इतिहासातील महापुरुषांच्या जीवनावरील व्याख्याने | ४२ | ६० |
| | | ७० | १०० |

वरील कोष्टकावरून [४. ५०] हे स्पष्ट होते की, शाळेत आयोजित केलेल्या वक्त्यांच्या व्याख्यानापैकी इतिहासातील महापुरुषांच्या जीवनावरील व्याख्याने आयोजित करणाऱ्या शिक्षकांची संख्या [६०%] आहे. वीर पुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या यावरील भाषणे आयोजित करणाऱ्या शिक्षकांची संख्या [४०%] आहे.

वरील दोन्ही प्रतिसादांचा विचार करता हा मिळालेला प्रतिसाद इतिहासाच्या दृष्टीने योग्य आहे.

४. ९ मूल्यमापनाबाबत शिक्षकांनी दिलेली माहिती :

प्रश्न क्र. ५३ ते ५७ वरून मूल्यमापनाविषयी माहिती मिळते. विद्यार्थ्यांची वर्गातील प्रगती मोजण्यासाठी शिक्षक कोणकोणत्या साधनांचा वापर करतात. उदा. घटक चाचणी, संविधान तक्ता, लेखी परीक्षा, ~~ही प्रगती मोजण्यासाठी साधने आहेत~~. याचे पुढील काही कोष्टकांत विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.५१]

घटक चाचणीचे आयोजन करणे.

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ६३ | ९० |
| २] | नाही | ०७ | १० |
| | | ७० | १०० |

वरील कोष्टकावरून [४.५१] स्पष्ट होते की, घटकाचे अध्यापन संपल्यावर त्यावर घटक चाचणी घेणाऱ्या शिक्षकांची संख्या [९०%] आहे. घटक संपल्यावर घटक चाचणी न घेणाऱ्या शिक्षकांची संख्या [१०%] आहे.

यांचा अर्थ असा की, घटक संपल्यावर घटक चाचणी घेणाऱ्या शिक्षकांचा संख्या जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे.

मुख्याध्यापकांना प्रश्नावलीमध्ये हाच प्रश्न [प्रश्न क्र.११] विचारला होता. त्याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

इतिहासातील प्रत्येक घटकाचे अध्यापन संपल्यावर [९०%] शिक्षक घटक चाचणी घेतात असे मत व्यक्त केले आहे. हा मिळालेला प्रतिसाद इतिहास अध्यापनांच्या दृष्टीने योग्य आहे. शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या प्रतिसादात साहचर्य आढळते.

पुढील कोष्टक क्र.[४.५२] वरुन घटक चाचणी घेण्यासाठी संविधान तक्ता तयार ~~करता~~ केला जातो काय या प्रश्नाचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. [४.५२]

संविधान तक्त्याचे आयोजन

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ५१ | ७२.८५ |
| २] | नाही | १९ | २७.१४ |
| | | ७० | १००.०० |

वरील कोष्टक क्र.[४.५२] वरुन स्पष्ट होते की, घटक चाचणी घेण्यासाठी संविधान तक्ता तयार करणाऱ्या शिक्षकांची संख्या [७२.८५%] आहे. घटक चाचणी घेण्यासाठी संविधान तक्ता तयार न करणाऱ्या शिक्षकांची संख्या [२७.१४%] आहे.

याचा अर्थ असा की, घटक चाचणी घेण्यासाठी संविधान तक्ता तयार करणाऱ्या शिक्षकांची संख्या जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद इतिहासाच्या दृष्टीने योग्य आहे.

पुढील कोष्टक क्र.[४.५३] मध्ये शाळेत विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी शिक्षक कोणकोणत्या साधनांचा वापर करतात याचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.५३]

विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी वापरलेली साधने

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १] | पदनिश्चयन यादी | २० | २८.५७ |
| २] | समाजनिती तंत्र | १५ | २१.४२ |
| ३] | आलेख | १५ | २१.४२ |
| ४] | वर्तणूकीची नोंद ठेवणे | ४५ | ६४.२८ |

वरील कोष्टक क्र.[४.५३] वरून स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी वापरण्यात येणा-या साधनापैकी वर्तणूकीची नोंद ठेवणे [६४.२८%] पदनिश्चयन यादीचा वापर करणे [२८.५७%]. या साधनांचा अधिक वापर केला आहे.

विद्यार्थ्यांची वर्षभरातील प्रगती मोजण्यासाठी या साधनांचा वापर करणे आवश्यक आहे. हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

पुढील कोष्टक क्र.[४.५४] मध्ये शाळेत न समजलेला भाग शिक्षक विद्यार्थ्यांना व्यक्तिगत समजावून देतात किंवा नाही या प्रश्नाचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.५४]

न समजलेला भाग विद्यार्थ्यांना समजावून देणे

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ६७ | ९५.७१ |
| २] | नाही | ०३ | ०४.२८ |
| | | ७० | १००.०० |

मागील कोष्टक क्र.[४.५४] वरुन स्पष्ट करता येते की, विद्यार्थ्यांना न समजलेला भाग समजावून देणा-या शिक्षकांची संख्या [९५.७१%] आहे. न समजलेला भाग समजावून न देणा-या शिक्षकांची संख्या [४.२८%] आहे.

याचा अर्थ असा की, न समजलेला भाग समजावून देणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे. हा मिळालेला प्रतिसाद योग्य आहे.

पुढील कोष्टका [४.५५] वरुन शिक्षकांनी लेखी परीक्षेबाबत दिलेल्या सूचनाचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र.[४.५५]

लेखी परीक्षेबाबत सुचविलेल्या उपायाचे स्वरूप

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या | प्रतिसादाचे शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १] | तोंडी परीक्षा घेणे | ५५ | ७८.५७ |
| २] | वर्षभरातील प्रासंगिक गुणांची नोंद ठेवणे | १७ | २४.२८ |
| ३] | वस्तुनिष्ठ प्रश्न ठेवणे | १२ | १७.१४ |
| ४] | गोपनियता राखणे | ०६ | ०८.५७ |

वरील कोष्टक क्र.[४.५५] वरुन स्पष्ट होते की, लेखी परीक्षेत सुधारणा करण्यासाठी तोंडी परीक्षा ~~घेणे~~ द्याव्यात म्हणणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [७८.५७%] आहे. वर्षभरातील प्रासंगिक गुणांची नोंद ठेवावी म्हणणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [२४.२८%] आहे. वस्तुनिष्ठ प्रश्न ठेवावेत म्हणणा-या शिक्षकांचा प्रतिसाद [१७.१४%] आहे.

याचा अर्थ असा की, लेखी परीक्षेत सुधारणा करण्यासाठी तोंडी परीक्षा घेण्यात यावी म्हणणारे शिक्षक जास्त आहेत. ~~[illegible]~~ विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा घेणे व त्याचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. तसेच वस्तुनिष्ठ प्रश्नावर भर देणे आवश्यक आहे.

### ४.१० मुख्याध्यापकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण:

प्रास्ताविक:-

शिक्षकांना तसेच मुख्याध्यापकांना विचारलेल्या प्रश्नामध्ये जे घटक समान होते त्याचे विश्लेषण आणि विशदीकरण यापूर्वीच केले गेले. परंतु मुख्याध्यापकांना जे काही इतर प्रश्न विचारले की ज्यांचा शिक्षक प्रश्नावलीत समावेश केला गेला नव्हता. अशा मुख्याध्यापकांना विचारलेल्या प्रश्नाचे विशदीकरण येथे देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रश्न क्र.१ वरुन स्पष्ट होते की, इयत्ता ८ वी ते १० वी ला इतिहास शिकविणारे दोनच शिक्षक आहेत असे ५०% मुख्याध्यापकांनी मत व्यक्त केले आहे.

प्रश्न २ वरुन स्पष्ट होते की, १००% मुख्याध्यापकांनी शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण केले आहे.

यावरुन अ सर्व मुख्याध्यापक शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करुन त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचे तसेच त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करतात, असे आढळून येते.

प्रश्न क्र.४ वरुन स्पष्ट होते की, मुख्याध्यापकांना इतिहास अध्यापनामध्ये कोणत्या उणीवा आढळतात या संदर्भात होता. त्याचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.

१] ४०% शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करीत नाहीत [५०%]

२] शैक्षणिक साधने शाळेत पुरेशी उपलब्ध नाहीत. [३०%]

३] शासनाने ठेवलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार बोजड आहे. [४०%]

४] पाठ्यपुस्तकातील इसवी सन व घटना विद्यार्थ्यांना न समजणा-या आहेत. ~~असे मत व्यक्त केले आहे~~. [३५%]

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ वरुन इतिहास अध्यापनात सुधारणा होण्यासाठी शासनाने व महाविद्यालयाने कोणते प्रयत्न करावेत या संदर्भात होता. त्याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

१] महाविद्यालयांनी व शासनांनी शाळांना शैक्षणिक साधनांचा पुरवठा करावा असे २०% मुख्याध्यापक म्हणतात.

२] महाविद्यालयांनी व शासनानी इतिहास विषयाची उद्बोधन सत्रे ठेवावीत असे १५% मुख्याध्यापक म्हणतात.

३] शाळेत इतिहासाचे साहित्य ठेवण्यासाठी वेगळ्या खोलीची व्यवस्था असावी असे २५% मुख्याध्यापक म्हणतात.

४] अभ्यासपूरक कार्यक्रमातून इतिहासाची जाण करुन द्यावी असे ३०% मुख्याध्यापक म्हणतात.

## ४.११ शाळांना दिलेल्या भेटीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण:-

ज्या शाळांतील मुख्याध्यापकांच्या मुलाखती अभ्यासकाने घेतल्या त्याच शाळांना भेटी दिल्या गेल्या, पाठाचे निरीक्षण केले. त्याचप्रमाणे इतिहास अध्यापनाबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा केली त्याचा सारांश खालील प्रमाणे.

१. ८०% शाळांच्या इमारती चांगल्या अवस्थेत नाहीत. क्रीडांगण बाबतही हीच परिस्थिती आहे.

२] ५०% शिक्षक खुर्चीवर बसून शिकवतात. ६०% ~~शिक्षक~~ इतिहासाचे शिक्षक इतिहासाचे पाठयपुस्तक वर्गात वाचून दाखवितात.

३] ८०% शिक्षक पारंपारिक पध्दतीचा वापर करतात. बहुतांशी शाळांत शैक्षणिक साधने अपुरी आहेत. शैक्षणिक साधनांचा वापर ७०% शिक्षक करीत नाहीत.

४] इतिहासासाठी तासिका अपु-या क वाटतात, ग्रंथालयात इतिहास पुस्तकांची संख्या कमी आहे. वर्तमानपत्रे वाचण्यास मिळत नाहीत असे ९०% विद्यार्थ्यांचे मत आहे. ८०% विद्यार्थ्यांच्या दैनंदीन गरजा भागत नाहीत.

एंकदरीत इतिहासाचे अध्यापन समाधानकारक नाही.

## ४.१२ सारांश:-

शिक्षकांची प्रश्नावली मुख्याध्यापकांच्या मुलाखती, शाळांना भेटी या व्दारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण विश्लेषण आणि विशदीकरण प्रस्तुत प्रकरणात केले आहे, मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसाद विश्वसनीय आहे. याची खात्री पटते. या माहितीवर आधारीतच पुढील प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी दिल्या आहेत.

# प्रकरण ५ वे

## :: निष्कर्ष आणि शिफारशी ::

### विभाग "अ"

### निष्कर्ष

५ [क] प्रास्ताविक

५ [ख] शिक्षकांच्या वैयक्तिक माहिती विषयी निष्कर्ष

५ [ग] इतिहास अध्यापनाच्या उद्दिष्टाबाबत निष्कर्ष.

५ [घ] अभ्यासक्रमा विषयीचे निष्कर्ष.

५ [च] इतिहासाची अध्यापन पध्दती व शैक्षणिक साधने बाबत निष्कर्ष.

५ [छ] इतिहास विषयाच्या ग्रंथालयाबाबत निष्कर्ष.

५ [ज] अभ्यासपूरक कार्यक्रमाविषयीचे निष्कर्ष.

५ [झ] मूल्यमापन विषयीचे निष्कर्ष.

### विभाग "ब"

### शिफारशी

५ [ट] शिक्षकांच्या वैयक्तिक माहिती विषयी शिफारशी.

५ [ठ] इतिहास अध्यापनाच्या उद्दिष्टाबाबत शिफारशी.

५ [ड] इतिहासाच्या अभ्यासक्रमाविषयीच्या शिफारशी.

५ [ढ] इतिहासाची अध्यापन पध्दती व शैक्षणिक साधने याबाबत शिफारशी.

५ [ण] इतिहासाचे ग्रंथालय याबाबत शिफारशी.

५ [त] अभ्यासपूरक कार्यक्रमा विषयी शिफारशी.

५ [थ] मूल्यमापनाबाबतच्या शिफारशी.

## विभाग "क"

## पुढील संशोधनासाठी विषय

५(द) इयत्ता ८ वी ते १० खेरीज इतर इयत्तांच्या इतिहास अध्यापनातील चुकांचा अभ्यास.

५(ध) इतिहास अध्यापनाच्या संदर्भात क्रमिक पुस्तकाचे मूल्यमापन.

५(न) इतिहास अध्यापनावरील स्वाध्याय माला.

५(प) इतिहास अध्यापनातील चुकांच्या कारणांचा शोध.

५(फ) इतिहास अध्यापनातील चुकांवरील सविस्तर उपाय.